मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दिनांक १६ फेब्रुवारी २०२४ । पान १

# शिवाजी महाराज प्रबोधन पर्वानिमित्त भव्य महानाट्य

## मान्यवरांच्या व्याख्यानांसह विविध कार्यक्रमांचे आयोजन

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिकेच्या वतीने १५ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी दरम्यान शहरात विविध ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्वाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या प्रबोधन पर्वास नागरिकांनी उपस्थित राहून उस्फुर्त प्रतिसाद दर्शवावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.प्रबोधन पर्वानिमित्त भक्ती-शक्ती चौक निगडी, संभाजीनगर येथील कमलनयन बजाज शाळेजवळ चिंचवड, डांगे चौक थेरगांव तसेच एच.ए. कॉलनी पिंपरी या चार ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच शिवजयंतीच्या दिवशी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १४ ठिकाणी असलेल्या पुतळ्यांसही महापालिकेच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. तसेच महापालिका माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित निबंध, वक्तृत्व तसेच चित्रकला स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे.



# लोकनेते स्व. लक्ष्मणभाऊंचे कार्य युवा पिढीला प्रेरणादायी : शंकर जगताप

## लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या जयंती निमित्त त्यांच्या स्मृतींना उजाळा

**मोशी**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** लोकनेते स्व. लक्ष्मणभाऊ हे एक समर्पित जनसेवक आणि कल्पक नेता होते. त्यांनी शहराच्या विकासासाठी अनेक महत्वाची कामे केली. गरिब आणि गरजू लोकांसाठी त्यांच्या मनात सदैव प्रेम होते. त्यांचे कार्य युवा पिढीसाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले. पिंपरी चिंचवड भाजपाचे माजी शहराध्यक्ष तथा आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या जयंती निमित्त त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी गुरुवार, दि. १५ रोजी



भाजप कार्यालय, पिंपरी मोरवाडी या ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या कार्याचा उजाळा देताना ते बोलत होते. संगी, स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. शंकर जगताप म्हणाले, स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात समाजासाठी आणि लोकांसाठी काम केले. ते नेहमीच गरीब आणि गरजू लोकांच्या मदतीला हजर असायचे. त्यांच्या कार्यशैलीमुळे ते लोकांमध्ये अत्यंत लोकप्रिय होते. युवा पिढीने स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या कर्तृत्वापासून प्रेरणा घेऊन समाजासाठी आणि लोकांसाठी काम करायला हवे, असे आवाहनही त्यांनी केले.यावेळी, मावळ लोकसभा संयोजक सदाशिव खाडे, वरिष्ठ उपाध्यक्ष तथा प्रवक्ते राजू दुर्गे, सरचिटणीस संजय मंगोडेकर, अजय पाताडे, शैला मोळक, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, युवा मोर्चा अध्यक्ष तुषार हिंगे, दक्षिण भारत आघाडी महाराष्ट्र प्रदेश संयोजक राजेश पिल्ले, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख काळूराम बारणे, पिंपरी विधानसभा निवडणूक प्रमुख अमित गोरखे, मंडल अध्यक्ष संदीप नखाते, निलेश अष्टेकर, सोमनाथ भोंडवे, माजी नगरसेवक माऊली थोरात, अभिषेक बारणे, हर्षल ढोरे, मोरेश्वर शेडगे, शेखर चिंचवडे, दिपक भंडारी, मधुकर बच्चे, गोपाळ मळेकर, गणेश वाळुंजकर, मनोज ब्राम्हणकर, सचिन काळभोर, खेमराज काळे, प्रदीपकुमार बेंद्रे, वैशाली खाडये, सुधीर साळुंखे, प्रदिप साळुंखे, संदेश गादिया, राजश्री जायभाय, तानाजी बारणे, विनोद तापकीर, जवाहर ढोरे, रविराज कोद्रे, प्रज्ञा हिटनाळीकर, सिमा चव्हाण, अश्विनी कांबळे, पल्लवी मारकड, रोहिणी रासकर, पल्लवी पाठक, दिपाली कलापूरे, रेखा काटे, कोमल गौडांडकर, रविंद्र प्रभुणे, दिनकर शिंपी, प्रकाश लोहार आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अमोल थोरात यांच्याकडून आयुक्तांचे 'कार्टून' व्हायरल

## होमहवनवरून शेखर सिंह यांच्यावर व्यंग

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** सध्या सातत्याने विविध कारणांमुळे चर्चेत राहणारे पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी आयुक्त बंगल्यावर होमहवन केला. विश्व कल्याण, पर्यावरण शुद्धी, तसेच नैसर्गिक संकटांपासून मुक्तीसाठी होमहवन करण्यात आले. यावरून आयुक्त सिंह यांच्यावर व्यंगचित्र (कार्टून) काढून उपरोधिक टीका करण्यात आली आहे. भाजपाचे अमोल थोरात यांनी हे






कार्टून व्हायरल केले आहे.टीडीआर घोटाळा, प्रायोगिक तत्वावरील फसलेले प्रकल्प, दूरदृष्टी न ठेवता उदासीन राहून निर्णय घेणे, तसेच वाकड येथील निर्माणाधीन इमारत पाडावी लागल्याने महापालिकेवर ओढावलेली नामुष्की यासह विविध कारणांमुळे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्यावर सातत्याने आरोप तसेच टीका करण्यात आली. भाजपाचे अमोल थोरात यांनी त्याच अनुषंगाने एक कार्टून व्हायरल केले आहे. त्यामुळे आयुक्त सिंह पुन्हा चर्चेत आले आहेत. शेखर सिंह यांनी आयुक्त बंगल्यावर केलेल्या होमहवनसाठी महापालिकेच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना निमंत्रित केले होते. त्यामुळे बंगल्याच्या परिसराला जत्रेचे स्वरुप आले होते. तसेच कार्यक्रमस्थळी लावण्यात आलेल्या फलकावर होमहवनाचा हेतू स्पष्ट करण्यात आला होता. त्यासाठी फलकावर एक सुविचार देखील नमूद केला होता. त्याच सुविचाराचा उपहासात्मक वापर या कार्टूनमध्ये करण्यात आला आहे.

# जुन्या वाहनांना नवीन नंबर प्लेट!

## नंबर प्लेट बंधनकारक! लवकरच अंमलबजावणी सुरु होणार

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
देशभरात एप्रिल २०१९ नंतर नवीन वाहनांना उच्च सुरक्षा क्रमांक पाट्या (हाय सिक्युरिटी नंबर प्लेट) बंधनकारक करण्यात आल्या. त्यानंतर केंद्र सरकारने जुन्या वाहनांनाही या क्रमांक पाट्या बंधनकारक केल्या आहेत. त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी राज्य सरकारकडे आहे. त्यामुळे परिवहन आयुक्त कार्यालयाने राज्य सरकारला याबाबत प्रस्ताव पाठविला असून, लवकरच त्यावर निर्णय अपेक्षित आहे.




केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाने डिसेंबर २०१८ मध्ये वाहनांसाठी उच्च सुरक्षा क्रमांक पाट्या बंधनकारक करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाची अंमलबजावणी एप्रिल २०१९ पासून नवीन वाहनांसाठी सुरू झाली. नव्या वाहनांना उत्पादकांनी किंवा वितरकांनी या पाट्या बसवून देणे बंधनकारक करण्यात आले. केंद्र सरकारने जुन्या वाहनांनीही उच्च सुरक्षा क्रमांक पाट्या बंधनकारक केल्या आहेत. प्रत्येक राज्याने याची अंमलबजावणी करावयाची आहे. परिवहन आयुक्त कार्यालयाने राज्य सरकारला याबाबत प्रस्ताव पाठविला आहे. यावर लवकरच निर्णय होणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.गुन्हेगार गुन्हा केल्यानंतर पोलिसांपासून पळ काढण्यासाठी वाहन क्रमांकाच्या पाट्यांमध्ये बदल करतात. क्रमांक बदलल्यामुळे अनेकदा वाहने सापडत नाहीत. त्यामुळे गुन्हेगारही हाती येत नाहीत. या प्रकारांना उच्च सुरक्षा क्रमांक पाट्या बंधनकारक करण्यात आल्या. या पाट्यांमध्ये बदल करणे शक्य नसल्याने एकप्रकारे वाहनांचा गुन्हेगारी वापर करण्यावर अंकुश ठेवता येईल, असा प्रयत्न होता. याला यश आल्याने जुन्या वाहनांनाही या पाट्या बंधनकारक केल्या जाणार आहेत. याबाबतची निविदा प्रक्रियाही राबविण्यात आली आहे, असे सूत्रांनी स्पष्ट केले.उच्च सुरक्षा क्रमांक पाटी ही थ्रीडी होलोग्राम स्टीकर असते. त्यावर वाहनाच्या इंजिनाचा क्रमांक आणि वाहनाचा सांगाडा क्रमांक असतो. या पाट्यांमध्ये बदल करता येत नाही आणि त्यांचा आकारही बदलता येत नाही. या पाटीवर बारकोड असून, आरटीओ किंवा वाहतूक पोलिसांनी स्कॅन केल्यास वाहनाबाबतची संपूर्ण माहिती मिळते. पाटीवर एक इलेक्ट्रॉनिक चिप आणि गोपनीय क्रमांक असतो, तो वाहनाशी जोडलेला असतो. हा गोपनीय क्रमांक एकदा वाहन पाटीशी जोडला गेल्यानंतर दोन्ही बाजूने लॉक होतो. त्यानंतर कोणीही ते लॉक उघडू शकत नाही. या पाट्या ॲल्युमिनिअम मिश्र धातूपासून बनवलेल्या असतात.परिवहन आयुक्त कार्यालयाने राज्य सरकारला याबाबत प्रस्ताव पाठविला आहे. यावर लवकरच निर्णय होणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.गुन्हेगार गुन्हा केल्यानंतर पोलिसांपासून पळ काढण्यासाठी वाहन क्रमांकाच्या पाट्यांमध्ये बदल करतात. क्रमांक बदलल्यामुळे अनेकदा वाहने सापडत नाहीत. त्यामुळे गुन्हेगारही हाती येत नाहीत. क्रमांक पाट्या बंधनकारक करण्यात आल्या. या पाट्यांमध्ये बदल करणे शक्य नसल्याने एकप्रकारे वाहनांचा गुन्हेगारी वापर करण्यावर अंकुश ठेवता येईल, असा प्रयत्न होता. यश आल्याने जुन्या वाहनांनाही या पाट्या बंधनकारक केल्या जाणार आहेत. याबाबतची निविदा प्रक्रियाही राबविण्यात आली आहे, असे सूत्रांनी स्पष्ट केले.उच्च सुरक्षा क्रमांक पाटी ही थ्रीडी होलोग्राम स्टीकर असते. त्यावर वाहनाच्या इंजिनाचा क्रमांक आणि वाहनाचा सांगाडा क्रमांक असतो. या पाट्यांमध्ये बदल करता येत नाही आणि त्यांचा आकारही बदलता येत नाही. या पाटीवर बारकोड असून, आरटीओ किंवा वाहतूक पोलिसांनी स्कॅन केल्यास वाहनाबाबतची संपूर्ण माहिती मिळते. पाटीवर एक इलेक्ट्रॉनिक चिप आणि गोपनीय क्रमांक असतो, तो वाहनाशी जोडलेला असतो. हा गोपनीय क्रमांक एकदा वाहन पाटीशी जोडला गेल्यानंतर दोन्ही बाजूने लॉक होतो. त्यानंतर कोणीही ते लॉक उघडू शकत नाही.

# ५० किलो चांदी चोरून पेढीतील व्यवस्थापक पसार

## सराफी पेढीवर प्राप्तीकर विभागाचा छापा पडणार असल्याची बतावणी

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
सराफी पेढीवर प्राप्तीकर विभागाचा छापा पडणार असल्याची बतावणी करून पेढीतील व्यवस्थापकाने पाच किलो सोन्याचे दागिने, ५० किलो चांदी, रोकड असा दोन कोटी २७ लाख रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. याप्रकरणी हडपसर पोलीस ठाण्यात पसार झालेल्या व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनोद रमेश कुलकर्णी (वय ३५, रा. लोणी काळभोर) असे गुन्हा दाखल आलेल्या व्यवस्थापकाचे नाव आहे. याबाबत ज्योतीरादित्य उर्फ यश राजेंद्र मोकाशी (वय २२, रा. निलगिरी लेन, बाणेर रस्ता, औंध) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना १२ मार्च २०२२ ते ८ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत घडली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी ज्योतिरादित्य मोकाशी यांचे वडील राजेंद्र



मोकाशी सहायक पोलीस आयुक्त आहेत. यश यांनी दोन वर्षांपूर्वी हडपसर परिसरातील माळवाडी परिसरात वसुंधरा ज्वेलर्स सराफी पेढी सुरू केली होती. आरोपी विनोद कुलकर्णी सराफी पेढीत व्यवस्थापक होता. त्यावेळी सराफी पेढीत दागिने घडविण्यासाठी पाच किलो सोने आणि ८५ किलो चांदी खरेदी करण्यात आली होती. यश यांनी सोने, चांदी व्यवस्थापक विनोद कुलकर्णी याला दिली होती. त्यानंतर यश उच्चशिक्षणासाठी लंडनला गेले, शिक्षण पूर्ण झाल्यानंतर यश डिसेंबर २०२३ मध्ये पुण्यात आले. त्यांनी पुन्हा सराफी पेढीचे काम पाहण्यास सुरुवात केली. दागिने घडविण्यासाठी पाच किलो सोने आणि ८५ किलो चांदी खरेदी करण्यात आली होती. यश यांनी चौकशी केली. तेव्हा पावणेतीन किलो सोने आणि ५० किलो चांदी कमी असल्याचे लक्षात आले. यश यांनी याबाबतची माहिती सहायक पोलीस आयुक्त असलेले वडील राजेंद्र मोकाशी यांना दिली. कुलकर्णीकडे विचारणा करण्यात आली. तेव्हा ७ फेब्रुवारी रोजी सर्व सोने आणि चांदी परत करतो, असे सांगितले. त्यानंतर ८ फेब्रुवारी रोजी कुलकर्णीने सकाळी दहाच्या सुमारास सराफी पेढीतील कर्मचाऱ्याच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. सराफी पेढीवर प्राप्तीकर विभागाचा छापा पडणार असल्याची बतावणी केली. सराफी पेढीच्या मालकांना हिशेब द्यायचा आहे.

# सरकारी कार्यालयांना देणार महावितरण 'शॉक'

## वाढत्या थकबाकीमुळे महावितरणची आर्थिक स्थिती खडतर

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** सरकारी काम सहा महिने थांब' हा कोणत्याही सरकारी कार्यालयात गेल्यानंतर सर्वसामान्य नागरिकांना येणारा अनुभव महावितरणलाही आला आहे. वीजबिलांच्या वाढत्या थकबाकीमुळे महावितरणची आर्थिक स्थिती आधीच खडतर आहे. त्यात भर म्हणून सरकारी कार्यालयांकडील वीजबिलांची थकबाकी वाढली आहे. यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील प्रामुख्याने पोलीस विभाग, जिल्हा परिषदेच्या ७३६५ विविध कार्यालये, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांचा समावेश आहे.महावितरणचे पुणे प्रादेशिक संचालक अंकुश नाळे यांनी पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त, पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस विभागाचे पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक यांना वीजबिलांच्या थकबाकीची रक्कम तातडीने भरण्यासाठी विनंती पत्र पाठविले आहे. या पत्रासोबतच संबंधित थकबाकीदार कार्यालयांची यादी देखील जोडण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्रात गेल्या काही महिन्यांपासून घरगुती, कमर्शिअल आणि औद्योगिक ग्राहकांकडून मासिक वीजबिले भरली जात नाहीत.



सध्या पश्चिम महाराष्ट्रात घरगुती, कमर्शिअल आणि औद्योगिक वर्गवारीतील १७ लाख ८५ हजार वीजग्राहकांकडे ३३२ कोटी ७९ लाख रुपयांची थकबाकी आहे. ही थकबाकी वसूल करण्यासाठी महावितरणने वीजपुरवठा खंडित करण्याची धडक मोहीम सुरु केली आहे. सरकारी कार्यालयांनी थकीत रक्कम न भरल्यास वीजपुरवठा खंडित करण्याचा इशारा देण्यात आला आहे. पुणे जिल्ह्यात ४३४८ सरकारी कार्यालयांकडे ८ कोटी ५७ लाख रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये पुणे महानगरपालिकेच्या ५५२ कार्यालयांकडे ६३ लाख, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या ८४० कार्यालयांकडे १ कोटी ११ लाख, पुणे जिल्हा परिषदेच्या १९१३ कार्यालयांकडे ५ कोटी ५८ लाख तसेच पुणे, पिंपरी चिंचवड शहर आणि पुणे ग्रामीण पोलीस विभागाच्या १०४३ कार्यालयांकडे १ कोटी २५ लाख रुपये थकबाकी आहे.सातारा जिल्ह्यात १३९३ सरकारी कार्यालयांच्या वीजबिलांची २ कोटी ११ लाख रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये सातारा जिल्हा परिषदेच्या १२८५ कार्यालयांच्या १ कोटी ९७ लाख आणि जिल्हा पोलीस विभागाच्या १०८ कार्यालयांच्या १३ लाख रुपयांच्या थकबाकीचा समावेश आहे. तसेच सोलापूर जिल्हा परिषदेच्या १६२१ कार्यालयांचे ४ कोटी ७६ लाख आणि जिल्हा पोलीस विभागाच्या ८५ कार्यालयांचे १७ लाख असे एकूण १७०६ कार्यालयांकडे ४ कोटी ९३ लाख रुपयांच्या वीजबिलांची थकबाकी सोलापूर जिल्ह्यात आहे.

### सरकारी काम सहा महिने थांब

» सांगली जिल्हा परिषदेच्या ८९२ कार्यालयांकडे २ कोटी ९ लाख आणि पोलीस विभागाच्या २१९ कार्यालयांकडे १८ लाख असे एकूण १ हजार १११ कार्यालयांकडे २ कोटी २७ लाख रुपयांच्या वीजबिलांची थकबाकी सांगली जिल्ह्यात आहे. तर कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या १४६ कार्यालयांकडे ५ कोटी १९ लाख आणि जिल्हा पोलीस विभागाच्या ५३ कार्यालयांकडे ६ लाख असे एकूण १९९ कार्यालयांकडे ५ कोटी २६ लाख रुपयांच्या वीजबिलांची थकबाकी कोल्हापूर जिल्ह्यात आहे. सरकारी काम सहा महिने थांब' हा कोणत्याही सरकारी कार्यालयात गेल्यानंतर सर्वसामान्य नागरिकांना येणारा अनुभव महावितरणलाही आला आहे.

# राज्यातील ४० गोशाळांसाठी 'स्मार्ट गोशाळा' प्रकल्प

## सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या सहाय्यातून हा प्रकल्प

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** देशी गोवंशाच्या जतनासाठी राज्यातील ४० गोशाळा स्मार्ट गोशाळा म्हणून विकसित केल्या जाणार आहेत. केंद्र सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या सहाय्यातून हा स्मार्ट गोशाळा प्रकल्प साकारणार आहे, अशी माहिती आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी गुरुवारी दिली. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे टेक्निकल इन्स्टिट्यूट आणि



मोरोपंत पिंगळे गोधन फाऊंडेशन यांच्यातर्फे झालेल्या 'गाईच्या शेणापासून रंगनिर्मिती' या विषयावरील तांत्रिक चर्चासत्राचे उद्घाटन मुंदडा यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक प्रा. सुरेश जाधव, संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष प्रमोद रावत, सदस्य जगदीश कदम, डॉ. रवींद्र आचार्य, खेमराज रणपिसे, कार्यवाह धनंजय कुलकर्णी, गोसेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष मयुरेश जोगदेव उपस्थित होती.महाराष्ट्रातील गोवंशाची संख्या एक कोटी ३९ लाख एवढी असून त्यातील देशी गोवंशाची संख्या १३ लाख आहे. या देशी गोवंशाचा सांभाळ करतानाच एकही गाय कत्तलखान्यात जाणार नाही, हे लक्ष्य ठेऊन गोसेवा आयोगाचे काम सुरू आहे. राज्यात १,०६८ गोशाळा आहेत आणि त्यातील ४० गोशाळा अशा आहेत की ज्यामध्ये एक हजारपेक्षा अधिक गायींचा सांभाळ केला जात आहे. या गोशाळा स्मार्ट गोशाळा म्हणून विकसित केल्या जाणार असून तेथील गायीच्या शेणापासून सीएनजीची निर्मिती करण्याची योजना हाती घेतली जाणार आहे. केंद्र सरकारबरोबर करार १७ फेब्रुवारीला केला जाईल. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाकडून त्यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध होणार आहे. गायीचे शेण आणि गोमूत्राचा वापर, त्यापासून उत्पादने तयार करणे या क्षेत्रात क्रांती होणे आवश्यक असून तसे झाल्यास तर देशी गायी वाचवण्यात यश येईल, असे मुंदडा यांनी सांगितले.